CMYK

देऊळगाव साकरर्शा, वरवंड येथे ८० लाखांच्या विकास कामांचे संजय रायमुलकर यांच्या हस्ते लोकार्पण,भूमिपूजन >> पान 2
समृद्धी महामार्गावर भीषण अपघात होता होता टळला >> पान 3
राज्य क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा >> पान 4


सुविचार
मूल्यांनी सज्ञ असलेले जीवनच खरे समाधान देणारे असते.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 156 ■ शुक्रवार, दि. 17 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

मायोसिटिसनंतर समंथा प्रभू जडला आणखी एका गंभीर आजार, झाली अशी अवस्था

आतील पान


# अंतराळात डॉकिंग करणारा चौथा देश ठरला भारत

बंगळुरु : अंतराळात दोन अंतराळयानांना यशस्वीरित्या डॉक करणारा भारत हा चौथा देश ठरला आहे. याआधी केवळ रशिया, अमेरिका आणि चीनलाच हे यश मिळाले आहे. इस्रोने अंतराळात डॉकिंग यशस्वी झाल्याचे म्हटले आहे. आज १६ जानेवारीला ही मोहीम फत्ते झाल्याने चांद्रयान-४, गगनयान आणि भारतीय अंतराळ स्थानकासारख्या मोहिमांना शंभर हत्तींचे बळ मिळालं आहे. चांद्रयान-४ मोहिमेत चंद्राच्या मातीचे नमुने पृथ्वीवर आणले जातील. गगनयान मोहिमेत मानवाला अवकाशात पाठवले जाणार आहे.

## इस्रोने दोन अंतराळयाने जोडली, स्पेसएक्स मिशन ३० डिसेंबर रोजी लाँच

इस्त्रो ने ३० डिसेंबर २०२४ रोजी रात्री १० वाजता श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून अंतराळ डॉकिंग प्रयोग मोहीम प्रक्षेपित केली होती. या अंतर्गत पीएसएलव्ही-सी६० रॉकेटच्या सहाय्याने पृथ्वीपासून ४७० किमीवर दोन अंतराळ यान तैनात करण्यात आले.

७ जानेवारी रोजी या मोहिमेत दोन्ही अंतराळयान जोडले जाणार होते, परंतु ते पुढे ढकलण्यात आले. त्यानंतर ९ जानेवारीलाही तांत्रिक अडचणींमुळे डॉकिंग पुढे ढकलण्यात आले. १२ जानेवारी रोजी अंतराळयानांना ३ मीटर जवळ आणल्यानंतर त्यांना पुन्हा सुरक्षित अंतरावर नेण्यात आले.



डॉकिंगनंतर इस्रोने कोणती माहिती दिली?

यशस्वी डॉकिंगनंतर इस्रोने सांगितले, अंतराळयानाचे डॉकिंग यशस्वीरीत्या पूर्ण झाले! एक ऐतिहासिक क्षण. अंतराळयानामधील अंतर १५ मीटरवरून ३ मीटरपर्यंत खाली आणले गेले. डॉकिंग अचूकतेने सुरू करण्यात आले, परिणामी अंतराळयान यशस्वीपणे कॅप्चर करण्यात आले. डॉकिंग यशस्वीरित्या पूर्ण झाले. स्पेस डॉकिंग यशस्वी करणारा भारत हा चौथा देश ठरला. संपूर्ण टीमचे अभिनंदन! भारताचे अभिनंदन! डॉकिंगनंतर, दोन अंतराळ यानांवर एकच वस्तू म्हणून नियंत्रण ठेवण्यात यश आले. अनडॉकिंग आणि पॉवर ट्रान्सफर चेक येत्या काही दिवसांत घेण्यात येतील.

>> पान २

# सैफ अली खानवर जीवघेणा हल्ला

दैनिक आपला विदर्भ




**मुंबई/प्रतिनिधी : बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान हल्ला प्रकरणाचा तपास आता क्राईम ब्रांचकडे देण्यात आला आहे. क्राईम ब्रांच अधिकारी सैफ अली खानच्या घरी दाखल झाले आहेत. सैफच्या वांद्रे येथील राहत्या घरी त्याच्यावर चोरट्याने हल्ला केला होता, यानंतर गंभीर जखमी अवस्थेत त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. यानंतर आता या प्रकरणाचा तपास वेगाने सुरु आहे. गुन्हे शाखेचे अधिकारी आता घटनास्थळी दाखल झाले असून त्यांच्याकडून कसून तपास करण्यात येत आहे.**

प्राथमिक माहितीनुसार, सैफ अली खानच्या राहत्या घरी मध्यरात्री २ वाजेच्या सुमारास चोर शिरला. ही बाब चोरांच्या लक्षात येताच त्यांनी आरडाओरडा केला. यानंतर सैफची चोरासोबत झटापट झाली. यावेळी चोराने सैफवर धारदार शस्त्राने वार केला. बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर बुधवारी रात्री उशिरा त्याच्या राहत्या घरात चाकू हल्ला झाला. यानंतर त्याला मुंबईतील लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्याची प्रकृती धोक्याबाहेर असल्याची माहिती आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना मध्यरात्रीच्या सुमारास घडली. चाकू हल्लूयात सैफच्या हाताला, पाठीच्या कण्याला आणि मानेला दुखापत झाली. सैफ अली खानचा पाठीला गंभीर दुखापत झाली असून त्याच्यावर रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली. तयांची पत्नी करीना कपूर खान त्याच्यासोबत रुग्णालयात उपस्थित आहे.

अभिनेता सैफ अली खानवर चोराने जीवघेणा हल्ला केला, त्यावेळी त्याच्या मुलांची नॅनीही जखमी झाली आहे. हायप्रोफाईल इमारतीच्या सुरक्षेत एवढी मोठी चूक झाली कशी असा प्रश्न्न आता उपस्थित होत आहे. दरम्यान, पोलिसांनी सैफ अली खानच्या घरात काम करणाऱ्या तीन जणांना ताब्यात घेतलं आहे. तिघांना ताब्यात घेतल्यानंतर, पोलिसांनी त्यांना पोलिस ठाण्यात नेल असून त्यांची चौकशी केली जाईल. पोलिसांनी या कर्मचाऱ्यांचे फोनही ताब्यात घेतले आहेत.

## सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्या आरोपीची ओळख पटली; घरात काम करणाऱ्या दोन महिलांना पोलिसांनी चौकशीसाठी नेलं!



मुंबई/प्रतिनिधी : सैफ अली खानवरील हल्ला

प्रकरणातल्या आरोपीची पोलिसांना ओळख पटल्याचं समोर आलं आहे. या आरोपीला लवकरच अटक केली जाईल असं पोलीस उपायुक्त दीक्षित गेडाम यांनी स्पष्ट केलंय. दरम्यान पोलिसांनी या प्रकरणात कलम १०९ अंतर्गत हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केलाय. त्यासह इतर कलमांअंतर्गतही विविध गुन्हे दाखल केलेत. आरोपी जिन्यावरून १२ मजले चढून वर आला आणि सैफ अली खानच्या घरात शिरला. सैफ अली खानच्या घरात तो चोरीच्याच उद्देशाने शिरल्याचं तपासात समोर येतंय, असं पोलीस उपायुक्त गेडाम यांनी स्पष्ट केलंय. हल्लूयाच्या विविध पैलूंचा तपास करण्यासाठी पोलिसांच्या १० टीम कार्यरत आहेत अशी माहितीही उपायुक्त गेडाम यांनी दिली आहे.

सैफ अली खानच्या घरी काम करणाऱ्या दोन महिलांची पोलीस चौकशी करत आहे. यातील एका महिलेच्या हाताला जखम असल्याचे दिसतंय. या दोघींची पोलीस चौकशी करत आहेत. सैफ अली खानच्या घरी काम करणाऱ्या एरियामा फिलिप्स उर्फ लिमा याच्या तक्रारीच्या आधारावर वांद्रे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आरोपीवर ट्रेस पासिग, चोरीसह जिवे मारण्याचा प्रयत्न या कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वांद्रे पोलिस स्टेशनच्या पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्या एका आरोपीची ओळख पटली आहे. आरोपी चोरीच्या उद्देशाने सैफ अली खानच्या घरात शिरला होता. आरोपीला लवकरच अटक केली जाईल. अटकेनंतर आम्ही तुम्हाला अधिक आणि सविस्तर माहिती देऊ, असं पोलिसांकडून सांगण्यात आले.

एका सूत्राने सांगितले की, सैफ अली खानच्या इमारतीशेजारी 'पेटफिना' नावाचा एक खूप जुना बंगला आहे आणि असा संशय आहे की संबंधित चोर सैफ अली खानच्या इमारतीच्या कंपाऊंड वॉलवरून उडी मारून आत आला आहे. फॉरेन्सिक टीमने त्या भिंतीची आणि त्या जागेचीही तपासणी केली आहे. सूत्रांनुसार, ही भिंत ६-८ फूट उंच आहे आणि त्यावर चढणे इतके कठीण नाही. हे लक्षात घेण्यासारखे आहे की हा तोच बंगला आहे जिथे दिवंगत प्रसिद्ध अभिनेत्री तबस्सुम राहत होत्या, आता तिच्या कुटुंबातील इतर सदस्य तिथे राहतात. तबस्सुम यांचे २२ नोव्हेंबर २०२२ रोजी निधन झाले.

# मुंबई, पुण्यासह राज्यभरात 'धुरळा' उडणार

महापालिका, जि.प. निवडणुका एप्रिलमध्ये होणार?



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकसभा, विधानसभा निवडणुकांनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध कार्यकर्ते व राजकीय पक्षाच्या प्रमुखांना लागले आहेत. त्यातच काही दिवसांपूर्वी शिवसेना खासदार संजय राऊत यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवणार असल्याची घोषणा केली. त्यामुळे, महाविकास आघाडी राहणार की नाही, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाल्याचं पाहायला मिळालं. त्यातच, सर्वच राजकीय पक्षांनी स्थानिक स्वराज्य पक्षांच्या निवडणुकांची तयारी सुरू केल्याचं पाहायला मिळत आहे. दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. २२ जानेवारी रोजी ही सुनावणी होत असून अंतिम सुनावणी व्हावी, यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच म्हटलं होतं.

महाराष्ट्रातील जवळपास २९ महागनरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषद आणि २८९ पंचायत समित्यांवर सध्या प्रशासक काम करत असून गेल्या २ वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून प्रशासक नेमण्यात आल्याने स्थानिक नेत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. मात्र, आता लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची बिगुल वाजणआर आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना राज्य पातळीवर वेग आला असून लवकरच राज्य निवडणूक आयुक्त यांच्या नावाची शिफारस होणार आहे, विशेष म्हणजे आजच ही शिफारस गेली जाणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे, आता विधानसभा निवडणुकांच्या विजयी जल्लोषानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकांचा विजयी गुलाल उधाळण्याची तयारी राजकीय पक्षांकडून सुरू होईल. दरम्यान, विधानसभा निवडणुकीत महायुतीला दैदिप्यमान यश मिळाल्याने महायुतीच्या नेत्यांचा आत्मविश्र्वास वाढला आहे.

मंत्रिपरिषदेच्या बैठकीत चर्चा करुन राज्य निवडणूक आयुक्तांच्या नावांची शिफारस केली जाणार आहे. गेली अनेक दिवसांपासून हे पद रिक्त आहे. त्यामुळे, निवणुकांपूर्वी ह्या पदावर नियुक्ती करणे महत्त्वाचे आहे. सध्या आरक्षणाच्या मुद्द्यावरुन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा विषय सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. मात्र, याच महिन्यात याप्रकरणी सुनावणी होणार आहे. त्यातच, ही सुनावणी अंतिम व्हावी, यासाठी राज्य सरकारकडून प्रयत्न केले जातील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रूवीच सांगितलं होतं. त्यामुळे, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना आता वेग आल्याचे दिसून आले. साधारणत: एप्रिल महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यासाठीच राज्य निवडणूक आयुक्तांच्या नावाची आज शिफारस केली जाणार आहे.

## महिलेवर बलात्कार करुन दोन अल्पवयीन मुलींचा विनयभंग करणाऱ्या मांत्रिकाला अटक, मुंबई पोलिसांची कारवाई

**मुंबई/प्रतिनिधी :** ४३ वर्षाच्या एका मांत्रिकाला मुंबई पोलिसांनी बलात्कार आणि विनयभंगाच्या आरोपांखाली अटक केली आहे. मुंबईतल्या गोरेगाव भागात एका ३७ वर्षीय महिलेवर या मांत्रिकाने बलात्कार केला. या प्रकरणात या मांत्रिकाला अटक करण्यात आली आहे. सुरुवातीला या मांत्रिकाने तुझ्या नवऱ्याला आजारातून बरं करतो वगैरे सांगून तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर नवऱ्याला आजारातून बरं करण्याच्या बहाण्याने या महिलेवर तीनवेळा बलात्कार केला. तू या गोष्टीची वाच्यता केलीस तर तुझ्या नवऱ्याला काळी जादू करुन मारुन टाकेन असेही या मांत्रिकाने धमकावले होते. आता पोलिसांनी या मांत्रिकाला अटक केली आहे.

# मोदी सरकारकडून ८ व्या वेतन आयोगाला मंजुरी

## २०२६ पासून लागू होतील शिफारशी; केंद्रीय कर्मचाऱ्यांना मिळणार लाभ

नवी दिल्ली,: केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांना मालामाल करणारी बातमी असून केंद्र सरकारने ८ व्या वेतन आयोगाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे, सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात मोठी वाढ होणार आहे. केंद्र सरकारकडून वेतन आयोगासंदर्भात नवा विचार केला जात असल्याची चर्चा होती. ८ व्या वेतना आयोगाऐवजी कर्मचाऱ्यांच्या पेन्शन आणि वेतनासंदर्भात नव्या मेकॅनिझमबाबत विचार केला जात आहे. येणाऱ्या काळात नव्या फॉर्म्युलाने कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ होऊ शकते, अशी चर्चा वेतन आयोगासंदर्भाने होती. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ८ व्या वेतन आयोगास मंजुरी दिली असून ८ व्या वेतना आयोगाची स्थापन करण्यात आल्याची घोषणाच केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

१८४७ पासून आत्तापर्यत ७ वेतन आयोगाला केंद्र सरकारीने मंजुरी दिली होती. आता, ८ व्या वेतना आयोगालाही केंद्र सरकारने मंजुरी दिल्याची माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली. केंद्र सरकारच्या सर्वच कर्मचाऱ्यांसाठी सरकारने ८ व्या वेतन आयोगाला मंजुरी देण्यात आली आहे. २०१६ साली यापूर्वीचा ७ वा वेतन आयोग मंजूर झाला होता. त्यानुसार, २०२६ मध्ये ८ वा वेतन आयोग लागू होईल. मात्र, २०२५ मध्ये ८ वा वेतन आयोग स्थापन केल्यास संपूर्ण प्रकियेसाठी १ वर्षाचा कालावधी मिळतो, असेही अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. केंद्र सरकार प्रत्येक १० वर्षांनी वेतन आयोग आणत असतो. सध्या देशात ७ वा वेतन आयोग आहे, याचा कार्यकाल २०२६ ला संपत आहे. त्या अगोदर अध्यक्ष आणि २ सदस्यांची नियुक्ती केली जाईल. सरकारने नियुक्त केलेला हा आयोग सर्व राज्यांशी चर्चा करेल. तसेच कर्मचाऱ्यांशी चर्चा आणि सूचना विचारात घेतल्या जातील.



७ व्या वेतन आयोगानुसार किती वाढली पगार

देशातील ७ व्या वेतन आयोगापूर्वी ४,५ आणि ६ व्या वेतना आयोगाचा कार्यकाळही १० वर्षांचा होता. सन २०१६ मध्ये ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आला होता. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात घसघशीत वाढ झाली होती. २.५७ चा फिटमेंट फैक्टर लागू करुन ७ वा वेतन आयोग देण्यात आला. त्यामुळे केंद्र सरकारच्या कर्मचारी आणि पेन्शनधारकांच्या मूळ पगारात २.५७ च्या पटीने वाढला. आता, सरकारने ८ वा वेतन आयोगा स्थापनेस मंजुरी दिली असून फिटमेंट फॅक्टर कमीत कमी २.८६ पटीने पगार वाढ होऊ शकते.

CMYK

## महाराष्ट्राचा विवेकी आवाज; प्रा डॉ एन डी पाटील

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज तिसरा स्मृतिदिन. तीन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे १७ जानेवारी २०२२ रोजी प्रा डॉ एन डी पाटील यांचे निधन झाले होते. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ( १९६२ ) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला. शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते. आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्र्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!


## फेअर प्ले बेटिंग ॲप प्रकरण : ईडीकडून आतापर्यंत ३४४ कोटींच्या मालमत्तेवर टाच

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** फेअर प्ले बेटिंग ॲप प्रकरणात सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) आतापर्यंत ३४४ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली आहे. याप्रकरणी ईडीने बुधवारी आठ कोटी ३७ लाख रुपयांच्या मामत्तेवर टाच आणली होती. आयपीएल क्रिकेट सामन्यांच्या बेकायदा प्रक्षेपणाप्रकरणी ईडी तपास करीत आहे. तसेच आयपीएल प्रसारणासह फेअर प्ले ॲपद्वारे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या निकालावरही सट्टेबाजी केल्याचा आरोप आहे. महाराष्ट्र सायबर विभागाने स्वामित्त्व हक्क भंग केल्याप्रकरणी फेअर प्ले ॲपसह इतर आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला होता. तक्रारदार वायकॉम १८ नेटवर्क कंपनीकडे इंडियन प्रीमियर लीग (आपीएल) सामन्यांच्या प्रसारणाचे हक्क होते. पण फेअर प्ले ॲपवर बेकायदेशीररित्या सामन्यांचे प्रसारण करण्यात आल्याचा आरोप आहे. त्याप्रकरणी ईडी तपास करीत आहे.वायकॉम १८ कंपनीकडे आयपीएल सामन्यांच्या प्रसारणाचे हक्क आहेत. पण फेअर प्ले ॲपवर सामान्यांचे बेकायदा प्रक्षेपण करण्यात आले. यावेळी सुमारे ४० चित्रपट कलाकारांनी या ॲपची जाहिरात केली. त्यामुळे डिजिटल स्वामित्त्व हक्कचा भंग झाल्याची तक्रार वायकॉम १८ ने म हाराष्ट्र सायबर पोलिसांकडे केली होती. त्यामुळे तक्रारदार कंपनीचे १०० कोटी रुपयांहून अधिक नुकसान झाल्याचा आरोप आहे. स्वामित्त्व हक्क भंग केल्याप्रकरणी महाराष्ट्र सायबरने फेअर प्ले ॲपविरोधात गुन्हा दाखल केला होता. त्याप्रकरणाच्या आधारावर ईडीनेही तपासाला सुरूवात केली होती.फेअर प्लेने दुबई आणि कुराकाओ येथील विदेशी संस्थांमार्फत प्रसिद्ध व्यक्तींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भारतीय संस्थांसोबत करार केल्याचे ईडीच्या तपासात उघड झाले आहे.

# देऊळगाव साकरर्शा, वरवंड येथे ८० लाखांच्या विकास कामांचे संजय रायमुलकर यांच्या हस्ते लोकार्पण,भूमिपूजन





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** तालुक्यातील देऊळगाव साकरर्शा आणि वरवंड येथे माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या ऐंशी लाखांच्या विकास कामाचे लोकार्पण व भूमिपूजन आज त्यांच्या हस्ते करण्यात आले. यापुढेही मेहकर लोणार तालुक्यात विकास कामांसाठी शासनाकडून निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे संजय रायमुलकर यांनी सांगितले.

देऊळगाव साखरशा येथील वीस लाख रुपये खर्चून बांधण्यात येत असलेले शादीखाना, नारायणपुरी संस्थान येथे वीस लाख रुपयांचे पेव्हर ब्लॉक बांधकाम व स्मशानभूमीतील सौंदर्यकरणाचे दहा लाखाचे बांधाकामाचा शुभारंभ संजय रायमुलकर यांच्या हस्ते आज करण्यात आला. सरपंच संदीप आल्हाट कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी दिलीप नवत्रे, अरुण गायकवाड, देविदास समुद्रवार, जीवन देशमुख, भिकाजी गायकवाड, हाफिज साहब ,सुपाजी पायघन यांच्या हस्ते संजय रायमुलकर यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला गावकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. मतदार संघातील एक लाख मतदारांनी आम्हाला मतदान केलेले असल्यामुळे नागरिकांच्या हितासाठी मी सदैव बांधील आहे ,असे यावेळी बोलतांना सांगून माजी आमदार संजय रायमुलकर म्हणाले की, राज्य व केंद्रात आपली सत्ता आहे त्यामुळे आणखीही मोठ्या प्रमाणात विकास कामे मंजूर करून आणण्यात येतील. यावेळी तेजराव नहार, पारखेड येथील सरपंच कंवरसिंग राठोड, स्वप्निल तोंडे, सुधाकर गायकवाड, मोतीचंद राठोड, साई गायकवाड, रोहिदास जाधव, दर्शन बघे ,अमोल नवत्रे ,राम गायकवाड ,जनार्दन तोंडे, रितेश दुगड ,संत रामदास महाराज ,सुनील सोळंके, संतोष रोतळे, दिलीप पायघन ,संतोष बुंदे, विजय डोलारे ,गणेश पाटील, शेख अहमद शेख निसार आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

वरवंड येथे स्मशानभूमी पेव्हर ब्लॉक बसविणे व मशीद जवळ ब्लॉक बांधकाम करणे या कामांचे भूमिपूजन रायमुलकर यांच्या हस्ते झाले. सुभाष नाहटा, सरपंच नागेश डोंगे, सुपाजी पायघन, विनोद राठोड, श्याम देशमुख यांच्या हस्ते संजय रायमुलकर यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला. याप्रसंगी दिलीप राज, दीपक आल्हाट, सहदेवराव आल्हाट ,कृष्णा गुरळकर, माजी सरपंच संतोष साखरे, पप्पू देशमुख ,रोहिदास जाधव, युवासेनेचे किशोर सुडोकार, अशोक हरमकर आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

पान १ वरून...

# अंतराळात डॉकिंग करणारा चौथा देश ठरला भारत

स्पेस मिशनचे उद्दिष्ट काय होते?

जगाला डॉकिंग आणि अनडॉकिंग तंत्रज्ञान दाखवणे

पृथ्वीच्या कक्षेत दोन लहान अंतराळयानांचे डॉकिंग आणि अनडॉकिंग तंत्रज्ञान प्रदर्शित करण्यासाठी.

दोन डॉक केलेल्या स्पेसक्राफ्टमध्ये इलेक्ट्रिक पॉवर हस्तांतरित करण्याच्या तंत्रज्ञानाचे प्रदर्शन करण्यासाठी.

स्पेस डॉकिंग म्हणजे अंतराळात दोन स्पेसक्राफ्ट जोडणे किंवा जोडणे.

दोन अंतराळयान कसे जवळ आले ते जाणून घ्या

३० डिसेंबर रोजी, दोन लहान अंतराळयान, लक्ष्य आणि चेझर, पीएसएलव्ही-सी६० रॉकेटद्वारे ४७० किमी उंचीवर वेगवेगळ्या कक्षांमध्ये सोडण्यात आले.

तैनातीनंतर, दोन्ही अंतराळयानाचा वेग ताशी २८,८०० किलोमीटर इतका झाला. हा वेग बुलेटच्या वेगापेक्षा १० पट जास्त होता.

दोन अंतराळयानांमध्ये थेट संपर्क नव्हता. त्यांना जमिनीवरून मार्गदर्शन करण्यात आले. दोन्ही अंतराळयान एकमेकांच्या जवळ आणले गेले.

५ किमी आणि ०.२५ किमी दरम्यानचे अंतर निर्धारित करण्यासाठी लेझर श्रेणी शोधकांचा वापर केला गेला.

एक डॉकिंग कॅमेरा ३०० मीटर ते १ मीटरच्या श्रेणीसाठी वापरला गेला. तर १ मीटर ते ० मीटर अंतरावर व्हिज्युअल कॅमेरे वापरात आले.

यशस्वी डॉकिंगनंतर, आता येत्या काही दिवसांत दोन अंतराळयानांमधील विद्युत ऊर्जा हस्तांतरणाचे प्रात्यक्षिक केले जाईल. त्यानंतर स्पेसक्राफ्टचे अनडॉकिंग होईल आणि ते दोघेही आपापल्या पेलोडचे ऑपरेशन सुरू करतील. हे सुमारे दोन वर्षे मौल्यवान डेटा प्रदान करणे सुरू ठेवेल.

चांद्रयान-४ सारख्या मोहिमांचे यश अवलंबून

चांद्रयान-४ मोहिमेत या तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल ज्यामध्ये चंद्रावरील नमुने पृथ्वीवर परत आणले जातील.

अंतराळ स्थानक तयार करण्यासाठी आणि नंतर तेथे प्रवास करण्यासाठी डॉकिंग तंत्रज्ञानाची देखील आवश्यकता असेल.

हे तंत्रज्ञान गगनयान मोहिमेसाठी देखील आवश्यक आहे ज्यामध्ये मानवांना अंतराळात पाठवले जाईल.

हे तंत्रज्ञान उपग्रह सेवा, आंतरग्रह मोहिमेसाठी आणि चंद्रावर मानव पाठवण्यासाठी आवश्यक आहे.

भारताने डॉकिंग यंत्रणेचे पेटंट घेतले

या डॉकिंग यंत्रणेला 'इंडियन डॉकिंग सिस्टम' असे नाव देण्यात आले आहे. इस्रोने या डॉकिंग प्रणालीचे पेटंटही घेतले आहे. कोणतीही अंतराळ संस्था या अत्यंत गुंतागुंतीच्या प्रक्रियेचे तपशील शेअर करत नसल्यामुळे भारताला स्वतःची डॉकिंग यंत्रणा विकसित करावी लागली.

## मायोसिटिसनंतर समंथा प्रभू जडला आणखी एका गंभीर आजार, झाली अशी अवस्था

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेत्री समंथा रुथ प्रभूची प्रकृती गेल्या काही दिवसांपासून ठीक नव्हती. सोशल मीडियावर एका पोस्टद्वारे तिने सांगितले की तिला चिकनगुनियाचा त्रास होत आहे. अभिनेत्रीने सांगितले की ती यातून सावरत आहे. समंथाने एक क्लिप पोस्ट केली ज्यामध्ये ती जिममध्ये व्यायाम करताना दिसत आहे. क्लिप शेअर करताना सामंथाने लिहिले की, 'चिकुनगुनियापासून बरे होणे खूप मजेदार आहे. तिने लिहिले की, अजूनही सांधे दुखत आहेत.

समंथा घेतेय रेड लाईट थेरपी

अभिनेत्रीने आता सोशल मीडियावर तिचे हेल्थ अपडेट शेअर केले आहे. समंथाने रेड लाईट थेरपी रूमजवळ स्वतः चा फोटो शेअर केला आहे. ही थेरपी चिकुनगुनियाच्या दीर्घकालीन परिणामांपासून आराम मिळवून देण्यासाठीचा एक उपाय आहे. ही थेरपी बऱ्याचदा त्वचेच्या समस्यांसाठी वापरली जाते. यामध्ये त्वचेवर लाल प्रकाशाची कमी पातळीची किरणे पडतात. ही एक प्रकारची फोटोथेरपी आहे. ज्यामुळे लोकांना सुरकुत्या, फ्रिकल्स आणि वृद्धत्व यां समस्यांपासून फायदा होतो. तथापि, त्याचे परिणाम, फायदे आणि संशयित दुष्परिणामांवर अजून संशोधन व्हायचे आहे.

चिकुनगुनिया हा विषाणू आहे. तो डासांच्या चावण्याने पसरतो. बहुतेक लोकांमध्ये, डास चावल्यानंतर तीन ते सात दिवसांत लक्षणे दिसू लागतात. यात सहसा ताप आणि सांधेदुखीचा समावेश होतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार, चिकुनगुनियाचा आजार बरा झाल्यानंतरही सांधेदुखीचा त्रास सुरूच राहतो. तुम्हाला आठवडे, महिने आणि वर्षांपर्यंत हा त्रास जाणवू शकतो. याशिवाय सांध्यांना सूज येणे, स्नायू दुखणे, डोकेदुखी यांसारख्या समस्याही असू शकतात.

या विषाणूची लागण झालेला डास चावल्यावर लोकांना चिकनगुनिया होतो. ते एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरत नाही. तथापि, जेव्हा डास एखाद्या संक्रमित व्यक्तीला चावतो तेव्हा त्याला विषाणूची लागण होते.


समंथा गेल्या वर्षीही तिच्या आरोग्याच्या समस्यांशी झुंजताना दिसली होती. वास्तविक २०२२ मध्ये तिला मायोसिटिसचे निदान झाले. ही एक ऑटोइम्यून स्थिती आहे जी स्नायूंच्या ताकदीवर परिणाम करते. अभिनेत्री तिच्या आरोग्याच्या समस्येबद्दल आणि तिच्या आयुष्यावर, करिअरवर झालेल्या परिणामाबद्दल नेहमीच उघडपणे बोलताना दिसते.

## प्रियकराच्या मदतीनेच पतीला संपवले; रत्नागिरी जिल्हात खळबळ

**दापोली/प्रतिनिधी :** आपला पती बेपत्ता झाल्याची तक्रार दापोली पोलीस स्थानकात दाखल करून आपण जणू काही केलेच नाही असं भासवणाऱ्या पत्नीनेच पतीचा आपल्या प्रियकराच्या साथीने गळा आवळून अत्यंत निर्घृणपद्धतीने खून करून मृतदेह विहिरीत टाकून दिल्याचा धक्कादायक व संतापजनक प्रकार दापोली तालुक्यात घडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. पती बेपत्ता झाल्याची तक्रार देणाऱ्या पत्नीवरच दापोली पोलिसांचा संशय होता, त्या दिशेने तपास करून अवघ्या ४८ तासातच दापोली पोलिसांना या हत्या प्रकरणाचा छडा लावण्यात मोठे यश आले आहे. केशकर्तनालयाचा व्यवसाय करणाऱ्या नीलेश दत्ताराम बागकर याचा कट रचून खून झाल्याच आता स्पष्ट झाल आहे. याप्रकरणी नेहा बागकर पालगड येथील एसटी चालक प्रियकर मंगेश चीजगरकर या दोघांनाही अटक करण्यात आली आहे.

# महाकुंभातील सर्वात सुंदर साध्वी हर्षाच्या 'या' कामावर भडकले शंकराचार्य; म्हणाले फक्त सुंदर आहे म्हणून...

नवी दिल्ली : प्रयागराजमधल्या महाकुंभमेळ्यात देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविक दररोज दाखल होतायत. कुंभमेळ्यात अनेक साधू, साध्वी आणि महंतांनी तंबू ठोकले आहेत. पण कुंभमेळ्यातल्या एका साध्वीनं मात्र सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलंय. सोशल मीडियावर ती सध्या प्रचंड लोकप्रिय झालीये. या साध्वीचं नाव हर्षा रिचारिया असं आहे. तिच्या सौंदर्यामुळे कुंभमेळ्यात तिचीच सर्वाधिक चर्चा आहे, मात्र साध्वी हर्षाच्या एका कृत्यावर साधू-संत चांगलेच भडकलेत.



हर्षा यांनी पहिले अमृत स्नान केल्याने वाद

मॉडेल साध्वी हर्षा यांना महाकुंभातील पहिले अमृत स्नान करु देणे आणि महामंडलेश्वर यांच्या शाही रथावर बसण्यावरुन वाद निर्माण झाला आहे. ज्योतिष पीठातील शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी या प्रकारावर नाराजी व्यक्त केली. अनेक प्रश्नही त्यांनी उपस्थित केले. शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी म्हटले की, महाकुंभात ही परंपरा सुरू करणे पूर्णपणे चुकीचे आहे. ही विकृत मानसिकता आहे.

'साध्वी हर्षाचे शाही रथावर बसणे पूर्णपणे चुकीचे'

शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद म्हणाले, महाकुंभात चेहऱ्याचं सौदर्य नाही, तर हृदयाची सुंदरता पाहिली जावी. मनाची सुंदरता पाहिली जावी. ज्या व्यक्तीने अजून संन्यास घ्यावा की लग्न करावे, हे निश्चित केले नाही, त्यांना संत-महात्मांच्या शाही रथावर स्थान देणेही चुकीचे आहे. भक्त म्हणून त्यांचा सहभाग ठीक आहे, पण भगवे कपडे परिधान करुन शाही रथावर बसणं पूर्णपणे चुकीचे आहे. ज्या प्रमाणे पोलिसांचा गणवेश केवळ पोलीस दलात सहभागी असणाऱ्यांना मिळतो, तसे भगवे वस्त्र फक्त संन्यासींना मिळते.

अमृत स्नान केल्यावर हर्षा काय म्हणाली?

अमृत स्नान केल्यानंतर हर्षाने सांगितले की, त्यांना दैवी अनुभव येत आहे. साध्वी हर्षा रिचारिया यांनी साध्वी म्हणण्यावर आक्षेप व्यक्त केला आणि कोणालाही आश्चर्य वाटेल असे उत्तर दिले. सुमारे अडीच वर्षापूर्वी त्यांनी निश्चितपणे आपल्या गुरूंकडून दीक्षा घेतली होती, परंतु सध्या ती संन्यास घेण्याबाबत कोणताही अंतिम निर्णय घेऊ इच्छित नाही, असं हर्षाने सांगितले.

मॉडेलिंग आणि अभिनयाचे झगमगते जग सोडून महाकुंभात

सोशल मीडियावर हर्षाबद्दल प्रचंड क्रेझ निर्माण झाली आहे. मॉडेलिंग आणि अभिनयाचं झगमगतं जग सोडून हर्षानं साध्वी होण्याचा मार्ग कसा पत्करला, याबद्दल आश्चर्य व्यक्त केलं जातंय. पण आपण केवळ दीक्षा घेतलीय, साध्वी बनलो नसल्याचं स्पष्टीकरण हर्षानं दिलंय. सोशल मीडियावर हर्षाचे मॉडेलिंग आणि अँकरिंगशी संबंधित फोटो आणि पोस्ट आहेत. एकंदरीत ३० वर्षाची हर्षा कुंभमेळ्याच्या निमित्तानं देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलीय, हे मात्र नक्की.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707


हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघात होता होता टळला

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** दिनांक १६..१.२०२५ रोजी सकाळी ०७.३० वा. दरम्यान चायनैज नंबर ३२६.२ नागपूर कॅरिडोर वर कार क्रमांक MH 12-FY-5901 चे चालक संकरित श्रीनिवास रेड्डी वय २३ वर्ष रा अंधेरी ,मुंबई हे मुंबईवरून लग्न समारंभासाठी नागपूरच्या दिशेने जात असताना सदर ठिकाणी कुत्रा आडवा आल्याने चालकाचे कार वरील नियंत्रण सुटल्याने कार अक्षरशा मिडीयम लेन कडून साईड बॅरिअरपर्यंत दोन्ही साईडला धडकली. यामध्ये सर्व प्रवासी यांनी सीट बेल्ट लावेल असल्यामुळे समोरील एअर बॅग उघडल्यामुळे प्राणहानी टळली परंतु कारचे अक्षरशः समोरील एक्सेल सहित दोन्ही चाके तुटून बाजूला झाली व पाठीमागून सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले .दैव बलतवर म्हणून यामध्ये श्लोक कोळमकर वय २४ वर्ष व पुष्पेन्द्र गुप्ता व २७ वर्ष हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना ताबडतोब समृद्धी महामार्गावरील रुग्णवाहीकेचे डॉक्टर शरद शेळके व चालक दिगंबर शिंदे यांनी प्रथमोपचार करून सिंदखेडराजा ग्रामीण रुग्णालय येथे भरती केले. व सोबत असलेले मोनाली टोपाल व २८ वर्ष व चालक हे किरकोळ जखमी झाले. तसेच कारचे समृद्धी महामार्गावर इंजिनचे दोन तुकडे होऊन चाके बाजूला तुटून पडल्याने काही काळ वाहतूक हळू प्रमाणात सुरु ठेवून महामार्ग पोलीस चे पीएसआय जितेंद्र राऊत पोलीस हेडकॉन्स्टेबल विठ्ठल काळुसे ,विजय आंधळे व महाराष्ट्र सुरक्षा बल चे गायकवाड व पवन सुरुशे व स्टॉप यांनी टठत टीम चे श्रीकृष्ण बच्छीरे ,आदित्य गोपाळे, दिगंबर इंगोले, नितीन भिसेन यांच्या मदतीने अपघातग्रस्त कार महामार्गाच्या साईडला घेऊन टोईंग करून सुरक्षित ठिकाणी उभे केले. व वाहतूक सुरळीत करण्यात आली.





विशेष म्हणजे सध्या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दिनांक एक जानेवारी ते ३१ जानेवारी २०२५ पर्यंत मा.अप्पर पोलीस महासंचालक वाहतूक सुरेश मेकला साहेब यांच्या आदेशाने व यशवंत सोळंके पोलीस अधीक्षक महामार्ग प्रादेशिक विभाग, नागपूर. यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा अभियान राबवून महामार्गावर होणाऱ्या अपघाताबद्दल पोस्टर, भिंती पत्रके वाटप करून व इतर जनजागृती कार्यक्रम करण्यात येत आहे. तरी सर्व वाहनधारकांनी नियमाचे पालन करूनच वाहन चालवावे असे आवाहन महामार्ग पोलीस चे प्रभारी अधिकारी संदीप इंगळे यांनी केले आहे

## महत्त्वाचे...


### महाराष्ट्र राज्य कारागृह अधिकारी, कर्मचारी विभागीय क्रीडा स्पर्धेला आजपासून सुरुवात



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य कारागृह अधिकारी, कर्मचारी विभागीय क्रीडा स्पर्धेला आजपासून सुरुवात झाली आहे. १६ जानेवारी ते १८ जानेवारी दरम्यान या स्पर्धा होणार आहेत. यावेळी क्रिकेटसोबत इतर खेळ देखील महत्वाचे आहेत त्यामुळे क्रिकेट सोबत इतर खेळांना सुद्धा प्राधान्या द्यावे असे अर्जुन पुरस्कार विजेत्या ललिता बाबर यांनी यावेळी सांगितले. तर जेल मधील स्टाफ हा खुप तणावाखाली असतो त्यामुळे अशा स्पर्धांमुळे त्यांचा ताण कमी होण्यासाठी मदत होते अशी प्रतिक्रिया कारागृह उपमहानिरीक्षक योगेश दळवी यांनी दिली आहे.

### प्रेमात अडसर ठरणाऱ्या पतीचा पत्नीने प्रियकराच्या मदतीने केला खून



दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** प्रेमात अडसर ठरणाऱ्या पतीचा पत्नीने आपल्या प्रियकराच्या मदतीने खून केल्याची घटना दापोलीत घडली आहे. अनैतिक संबंधातून पत्नीने प्रियकराच्या मदतीने पतीचा काटा काढल्याच्या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. आरोपी पत्नी नेहा निलेश बाक्कर व तिचा प्रियकर मंगेश चिंचघरकर याला दापोली पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. या दोघांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली गिम्हवणे गावात निलेश बाक्कर यांचा सलूनचा व्यवसाय होता. मात्र ते सोमवारीपासून बेपत्ता होते. त्यामुळे निलेश यांच्या भावाने आपला भाऊ बेपत्ता झाल्याची फिर्याद दापोली पोलीस स्थानकात दिली होती. त्यानुसार दापोली पोलिसांनी पत्नीकडे चौकशी केली असता तिच्या जबाबात तफावत आढळून आली, पोलिसांनी नेहा बाक्कर ज्या हॉटेलमध्ये कामाला होती, त्या हॉटेलचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता ते दोघेजण हॉटेलमधून बाहेर पडत असल्याचे दिसून आले. त्यामुळे पोलिसांचा संशय अधिक बळावला. आपल्याच नवऱ्याला प्रियकराच्या मदतीने दारू पाजून खून केला असल्याचे तपासात समोर आले आहे. त्यानंतर हा मृतदेह विहिरीत फेकला. मृतदेह पालगड पाटील वाडीतून दापोली रुग्णालयात या आणण्यात आला आहे. आरोपी म्हणून ताब्यात घेतलेला मंगेश चिंचघरकर हा बस चालक आहे. मंडणगड डेपोची बस दापोलीला वस्तीला घेऊन आला असता, त्याला दापोली पोलिसांनी सापळा रचून पकडला आहे. या प्रकरणी अधिक पोलीस करत आहेत.

### चोपड्यात गांजाची वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई; ३६ किलो गांजासह एकूण १२ लाख १६ हजार ५००रु. चा मुद्देमाल जप्त



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** चोपडा शहर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक मधुकर साळवे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून त्यांच्या पथकाने चोपडा शिरपूर रस्त्यावर दोन वेगवेगळ्या कारवाईत गांजा वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करून त्यांच्याकडून ३६ किलो गांजा तसेच इको मारुती कार, मोटर सायकल, मोबाईल असा एकूण १२ लाख १६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर दोन्ही कारवाईमध्ये सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. दोन्ही कारवाई पोलीस उपविभागीय अधिकारी अण्णासाहेब घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मधुकर साळवे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक एकनाथ भिसे व पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र वल्टे यांच्या सहकर्मचाऱ्यांनी केली आहे. नवीन वर्षात चोपडा शहर पोलीस स्टेशनची गांजा तस्करी करणाऱ्यांवरिधातील ही तिसरी कारवाई आहे.

### अनुपमा उपाध्याय दुसऱ्या फेरीत

नवी दिल्ली,: अनुपमा उपाध्यायने खपवळर जशिप २०२५ स्पर्धेत बुधवारी दोन उदयोन्मुख महिला एकेरी खेळाडूंमधील लढाई जिंकली. तर मालविका बनसोड आणि प्रियांशु राजावत यांनी त्यांच्यापेक्षा वरच्या क्रमांकाच्या प्रतिस्पर्धांना कडवी टक्कर देताना सर्वोत्तम कामगिरी केली. परंतु दुर्दैवाने त्यांना बुधवारी येथील केडी जाधव इनडोअर हॉलमध्ये योनेक्स-सनराईज इंडिया ओपन २०२५ च्या पहिल्या फेरीत पराभवाचा सामना करावा लागला.

### अहमदाबादमधून फरारी सराईत पाच गुंडांना कराडजवळ अटक, तळबीड पोलिसांची कारवाई

**कराड/प्रतिनिधी :** अहमदाबाद परिसरात दहशत माजवणाऱ्या कुख्यात पाच गुंडांनी दिल्लीमार्गे गोव्यात येऊन मौजमजा केली. त्यानंतर कोल्हापूरमध्ये देवदर्शन करून, ते मुंबईला जात असताना तळबीड पोलिसांनी नियोजनबध्द सापळा रचून पाचही गुंडांच्या मुसक्या आवळल्या. मिहिर बल्लदेवभाई देसाई (वय २२), प्रिन्स बजरंगलाल जागीड (वय २३), पवन कनुभाई ठाकूर (वय २५), कैलास कमुरचंद दरजी (वय ३४) आणि जिग्रेशभाई अमृतभाई रबारी (२६, सर्व रा. अहमदाबाद राज्य- गुजरात) अशी या गुंडांची नावे आहेत. त्यांना अहमदाबाद पोलिसांनी याब्यात घेतले. अहमदाबादच्या वस्त्रापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गंभीर गुन्हे असलेल्या कुख्यात गुंडांनी हाहाकार माजवला होता. यामुळे गुजरात पोलिसांच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. हे गुंड फरार झाल्याने त्यांना पकडण्यासाठी गुजरात पोलीस, गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस अहोरात्र झटत होते. दरम्यान, अहमदाबादच्या पोलीस अधीक्षकांनी सातारचे पोलीस अधीक्षक समीर शेख यांना यातील दोन गुंडांची छायाचित्रे पाठवत ते कोल्हापूरहून मुंबईला निघाल्याचे सांगितले. शेख यांनी सदरची आराम बस १५ मिनिटांत तासवडे पथकर नाक्यावर येत असल्याची माहिती तळबीड पोलीस ठाण्याचे पोलीस सहनिरीक्षक किरण भोसले यांना दिली.

## डोंबिवलीत आठ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार; आरोपी मानपाडा पोलिसांच्या ताब्यात




दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** डोंबिवलीत एक धक्कादायक घटना समोर आली आहे, एका आठ वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणात पीडित मुलीच्या कुटुंबियांनी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केल्यानंतर आरोपी विरोधात गुन्हा दाखल करून आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. वैभव जितेंद्र सिंग ( १९ ) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवलीत पीडित मुलगी आपल्या कुटुंबीयांसह राहत आहे. आरोपी वैभव सिंग याची बहीण ट्युशन टीचर आहे. परिसरातील मुलं त्याच्या घरी ट्युशनसाठी येत होते. १५ जानेवारी रात्री आठ वाजता पिडीत मुलगी आरोपीच्या घरी ट्युशनसाठी गेली होती, त्यावेळी घरात ट्युशन टीचर नव्हती. तेव्हा आरोपी वैभव याने पिडीत मुलीचा हात पकडून तिला बेडरूममध्ये नेले आणि जबरदस्ती तिच्यावर बलात्कार केला. घटनेनंतर पीडित मुलगी आपल्या घरी गेली आणि घडलेल्या घटनेबद्दल तिने कुटुंबियांना सांगितले. पीडित मुलीची कुटुंबियांनी मानपाडा पोलीस ठाण्यात जाऊन आरोपी वैभव सिंग विरुद्ध गुन्हा दाखल केला, त्यानंतर पोलिसांनी ताबडतोड आरोपीला अटक करून तपास सुरु केला आहे. तसेच १६ तारखेला या आरोपीला न्यायालयासमोर हजर करण्यात आले.

## श्रीहरीकोटा येथे इस्रोच्या सतीश धवन अंतराळ केंद्रात तिसरे लाँच पॅड स्थापित करण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

नवी दिल्ली,: पंतप्रधान नरेंद्र म ोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील इस्रोच्या सतीश धवन अंतराळ केंद्रात तिसरे लाँच(प्रक्षेपण) पॅड स्थापित करण्यास मान्यता देण्यात आली.

श्रीहरीकोटा येथे, तिसऱ्या लाँच पॅड प्रकल्पात दुसऱ्या लाँच पॅडसाठी स्टँडबाय लाँच पॅड म्हणून साहाय्य प्रदान करणे तसेच इस्रोच्या पुढच्या अद्ययावत प्रक्षेपकांसाठी आवश्यक प्रक्षेपण पायाभूत सुविधा स्थापित करणे, अभिप्रेत आहे. यामुळे भविष्यातील भारतीय मानवी अंतराळ मोहिमांसाठी प्रक्षेपण क्षमतादेखील वृद्धिंगत होईल. हा प्रकल्प राष्ट्रीय महत्त्वाचा प्रकल्प आहे.

अंमलबजावणी धोरण आणि उद्दिष्टे:

शक्य तितकी सार्वत्रिक आणि वापरयोग्य धाटणी (कॉन्फिगरेशन ), जी केवळ एनजीएलव्हीच नव्हे तर सेम ीक्रायोजेनिक स्टेजसह एलव्हीएम-३ वाहनांना तसेच एनजीएलव्हीच्या स्केल अप कॉन्फिगरेशनला देखील साहाय्यभूत होऊ शकेल, अशा प्रकारे या तिसऱ्या लाँच पॅड योजनेचे आरेखन करण्यात आले आहे. अधिकाधिक उद्योग सहभागाच्या माध्यमातून याची अंमलबजावणी केली जाईल. इस्रोचा पूर्वीचे लाँच पॅड स्थापित करण्यात असलेला अनुभव आणि आणि विद्यमान प्रक्षेपण संकुल सुविधा यांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेतला जाईल.४८ महिने किंवा ४ वर्षे या कालावधीत तिसरे लाँच पॅड स्थापित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी एकूण ३९८४.८६कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असून यात लाँच पॅडची स्थापना आणि संलग्न सुविधांचा समावेश आहे. लाभ : यामुळे देशाला अधिकाधिक प्रक्षेपणे शक्य होऊन म ानवी अंतराळ उड्डाणे आणि अंतराळ शोध मोहीम हाती घेण्याची राष्ट्रीय क्षमता वृद्धिंगत करणे शक्य होईल. अशा प्रकारे हा प्रकल्प भारतीय अंतराळ परिसंस्थेला चालना देईल.

भारतीय अवकाश वाहतूक प्रणाली आत्तापर्यंत पूर्णपणे फर्स्ट लॉन्च पॅड (एफएलपी) आणि सेकंड लॉन्च पॅड (एसएलपी) या दोन प्रक्षेपण पॅडवर अवलंबून होती. पीएसएलव्हीसाठी ३० वर्षापूर्वी एफएलपी बांधण्यात आले होते. पीएसएलव्ही आणि एसएसएलव्ही प्रक्षेपणासाठी याच पॅडचा वापर अजूनही केला जात आहे. एसएलपीचा वापर प्रामुख्याने जीएसएलव्ही आणि एलव्हीएम ३ साठी केला जातो. हे पॅड पीएसएलव्हीसाठी गरज भासली तर वापरता येते. एसएलपी जवळजवळ २० वर्षापासून कार्यरत आहे. चांद्रयान-३ मिशनसारख्या राष्ट्रीय मोहिमांसह पीएसएलव्ही एलव्हीएम३ अशा काही व्यावसायिक मोहिमांमध्ये अधिक चांगल्या रितीने उड्डाणासाठीची प्रक्षेपण क्षमता या पॅडमुळे वाढली आहे. एसएलपी देखील गगनयान मोहिमेसाठी मानवी मानांकित एलव्हीएम३ प्रक्षेपणासाठी सज्ज होत आहे. २०३५ पर्यंत भारतीय अंतरिक्ष स्थानक (बीएएस) आणि २०४० पर्यंत भारतीय क्रूड लूनर लँडिंगसह अमृत काळादरम्यान भारतीय अंतराळ कार्यक्रमाच्या विस्तारासाठी नवीन प्रोपल्शन सिस्टमसह जड प्रक्षेपण वाहनांच्या नव्या आवृत्तीची आवश्यकता आहे, सध्याच्या प्रक्षेपणाद्वारे ही गरज पूर्ण केली जाऊ शकत नाही. पॅड नेक्स्ट जनरेशन लॉन्च हेव्ही व्हेईकल्ससाठी आणि एसएलपीसाठी गरजेप्रमाणे तिसरा लाँच पॅड तातडीने उभारण्याची गरज आहे. त्यामुळे आणखी २५-३० वर्षापर्यंत अंतराळ वाहतुकीच्या गरजा पूर्ण करता येतील.

# जिल्ह्यातील उमेदवारांना इस्त्राईल येथे रोजगाराची संधी !

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत घरगुती सहाय्यक पदासाठी भरती

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत जिल्ह्यातील पुरुष व स्त्री उमेदवारांना, इस्त्राईल येथे घरगुती सहायक या कामासाठी रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. इच्छुकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बुलढाणा चे सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे.

इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असणाऱ्या २५ ते ४५ वयोगटाचे उमेदवार या संधीचा लाभ घेण्यास पात्र आहेत. सोबतच उमेदवारांकडे घरगुती सहायक सेवांसाठी निपुण/पारंगत, भारतातील सक्षम प्राधिकरणाव्दारे नियामक मान्यताप्राप्त असलेले व किमान ९९० तासांचा कोर्स पूर्ण केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. भारतीय प्राधिकरणाव्दारे प्रदान केलेल्या मिडवायफरीमधील प्रशिक्षण, संबंधित भारतीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली किंवा नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स असिस्टंट मधील प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक, तसेच जीडीए/एएनएम/जीएनएम/बीएससी नर्सिंग/पोस्ट बीएससी नर्सिंगची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.

**नोकरीचे वर्णन व तपशील पुढीलप्रमाणे:**

घरगुती सहायक पदाचे नाव असून त्यास किमान पात्रता १0वी उत्तीर्ण, अनुभव, डिप्लोमा आणि प्रमाणपत्र काळजीवाहक सेवा प्रदान करण्यासाठी पात्र आणि भारतातील सक्षम नियामक प्राधिकरणाकडून जारी केलेले प्रमाणपत्रधारक असावा, जो ९९० तासांच्या (जगढ सहित) मान्यताप्राप्त किंवा संबंधित भारतीय अधिकाऱ्यांद्वारे पर्यवेक्षण केलेला, किंवा पूर्णत्व सिद्ध करणारा डिप्लोमा यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे दाखवणारे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स सहाय्यक, किंवा प्रसूतीशास्त्र प्रशिक्षण पूर्ण केलेला, ज्याच्याकडे संबंधित भारतीय प्राधिकरणांकडून डिप्लोमा मान्यताप्राप्त आहे. जीडीए/एएनएम/जीएनएम/बीएससी नर्सींग/ पोस्ट बीएससी नर्सींग, इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक वयोमर्यादा २५ ते ४५ वर्षे, पुरुष/स्त्री उमेदवार पात्र. उंची/वजन - किमान ५ फूट / ४५ किलो किंवा अधिक. पासपोर्ट वैधता किमान ३ वर्षे. इतर आवश्यकता उमेदवाराने पूर्वी इस्त्राईलमध्ये काम केलेले नसावे. त्याचा/तिचा जोडीदार, पालक किंवा मुले इस्त्राईलमध्ये सध्या काम करत असू नयेत किंवा इस्त्राईल रहिवासी नसावा.




**इस्त्राईल येथे नोकरी**

इच्छुक उमेदवारांनी www.maharashtrainternational.com या संकेतस्थळावर नोंदणी करून परदेशातील रोजगार संधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय इमारत, तळमजला, बुलढाणा येथे कार्यालयीन वेळेत अथवा कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांक ०७२६२-२४२३४२ संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र चे सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे.

## विविध वृत्त...

### जिल्ह्यात राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानास आरंभ, ५० गट कार्यान्वित करण्यात येणार; ग्रामपंचायतींनी सहभागी होण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरात राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान योजना राबविण्याचे घोषित केले होते. त्यानुसार देशभरात १५ हजार नैसर्गिक शेती गट कार्यान्वित करण्यात येणार असून बुलढाणा जिल्ह्यात ५० गट कार्यान्वित करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमांमध्ये ग्रामपंचायतींचा सहभाग महत्त्वपूर्ण असल्यामुळे या अभियानात ग्रामपंचायतींनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर माननीय जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेत जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. सहभागी होणाऱ्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातून इच्छुक १२५ शेतकऱ्यांना प्रती शेतकरी एक एकर क्षेत्रासाठी सहभागी करून घेण्यात येणार असून प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर प्रत्येकी दोन कृषी सखींची निवड करण्यात येणार आहे. या कृषी सखींकडून इच्छुक शेतकऱ्यांचे अर्ज संकलित करून त्यांना नैसर्गिक शेती गटात समाविष्ट करतील. नैसर्गिक पद्धतीवर आधारित स्थानिक पशुधन शेती पद्धती लोकप्रिय करणे, जमिनीचा पोत सुधारणे, बाहेरून निविष्ठा खरेदी कमी करून शेतावरच आवश्यक निविष्ठा निर्मिती करणे व त्याचा वापर वाढवणे, शेतमाल उत्पादनासाठीचा खर्च कमी करणे आणि सहभागी शेतकऱ्यांच्या शेतीचे नैसर्गिक शेती प्रमाणीकरण करणे ही या अभियानाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. ज्या ग्रामपंचायतींना या अभियानात सहभागी व्हायचे आहे त्यांनी त्यांचे तालुका सनियंत्रण समिती अध्यक्ष तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे त्यांचे ग्रामपंचायतीची सहमती कळवावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

### शिक्षण विभागाच्यावतीने आज शैक्षणिक गुणवत्ता संमेलन !; विद्यार्थ्यांना 'सुगम पाठशाला' साहित्याचे होणार वितरण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्ह्यातील शाळेचा, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टिकोणातून शैक्षणिक गुणवत्ता संमेलन १७ जानेवारी रोजी सहकार विद्या मंदीर, बुलढाणा येथील सभागृहात होणार आहे. या कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण व प्रशिक्षण संस्था बुलडाणाचे प्राचार्य डॉ. जे.ओ.भटकर, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम.मोहन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड हे उपस्थित राहणार आहेत.

संमेलनात जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख व शाळेतील शिक्षक उपस्थित राहणार आहेत. तसेच संमेलनात विद्यार्थांच्या सर्वांगीण ज्ञानात वाढ व्हावी व संगीत क्षेत्राचे शिक्षण मिळावे. यासाठी जिल्ह्यात सुगम पाठशाला अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी संगीत साहित्याचे वितरण मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे नियोजन जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथ) बि.आर.खरात व प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### बुलढाण्यात आज निर्यातदारांसाठी कार्यशाळा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा उद्योग केंद्रामार्फत आज दि. १७ जानेवारी रोजी बुलडाणा अर्बन रेसिडेन्सी क्लब येथे निर्यातदारांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते होणार आहे. जिल्ह्यातील निर्यातदारांनी कार्यशाळेला उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे यांनी केले आहे.

निर्यात क्षेत्रात जागरूकता, उद्योजकता आणि शाश्र्वत आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राच्या पुढाकाराने उद्योग विकास आणि निर्यात आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत अमरावती क्षेत्राचे उद्योग सह संचालक निलेश निकम हे महाराष्ट्रातील निर्यात उपक्रमांविषयी माहिती देतील. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील बुलढाणा जिल्ह्यात सूक्ष्म, लघू आणि मध्यम (एमएसएमईएस) उद्योग वाढीची संभाव्यता आणि पुढील वाटचालीविषयी मार्गदर्शन करतील. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे बुलढाणा जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीविषयी माहिती देणार आहेत. सहायक संचालक स्नेहल ढोके ह्या केंद्र सरकारच्या निर्यात प्रोत्साहन योजनांची माहिती देतील.

कार्यशाळेच्या मध्यातरानंतर सल्लागार अंकीत गुप्ता हे बुलढाणा निर्यात कृती आराखड्याविषयी माहिती देतील. डाक निर्यात केंद्राविषयी अधीक्षक जी.एन. जाधव माहिती देतील. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे कृषी विभागाच्या निर्यात प्रोत्साहन योजनेविषयी माहिती देतील. कार्यशाळेच्या अंतिम टप्प्यात प्रश्नोत्तर घेतल्यानंतर समारोप करण्यात येईल. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी निर्यातदार, उद्योजकांनी https://forms.gle/PQr1QYgwZwwL5mTy7 या गुगल फॅार्मवर माहिती भरुन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे यांनी केले आहे.

# राज्य क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ







**बुलढाणा/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालयाअंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद बुलढाणा यांचे संयुक्त विद्यमान ऑलम्पिक वीर कुस्तीगीर स्व.खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त दुसरा राज्य क्रीडा दिन दि. १५ जानेवारी रोजी भारत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, बुलढाणा येथे साजरा करण्यात आला. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी आणि प्राविण्य प्राप्त खेळाडूंचा मान्यवरांचे शुभहस्ते गुलाब पुष्प मोमेंटो प्रदान करुन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष बुलढाणा जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष ठाकरे, प्रमुख अतिथी प्राचार्य इंगळे मॅडम, भारत विद्यालय चे वरिष्ठ शिक्षक संजय देवल शिवशंकर विद्यालय भरोसा तालुका चिखली येथील शारीरिक शिक्षण शिक्षक तथा चिखलीचे क्रीडा स्पर्धा संयोजक लांडकर सर, तालुका क्रीडा अधिकारी मेहकर मिलिंद काटोलकर, इत्यादी उपस्थित होते.

सर्वप्रथम व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांचे शुभ हस्ते दिप प्रज्वलित करून ऑलिंपिक वीर कुस्तीपटू स्व.खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन तथा हारार्पण करण्यात आले. तद्नंतर यावेळी व्यासपीठावर उपस्थित जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी उपस्थित मान्यवरांची खाशाबा जाधव यांच्या जीवनावरील माहिती पुस्तक, गुलाब पुष्प आणि मोमेन्टो प्रदान करुन सन्मानीत केले. तसेच आपल्या प्रास्ताविकपर मार्गदर्शनामध्ये स्व. खाशाबा जाधव यांचा जीवन परिचय करून दिला. राज्य क्रीडा दिनाच्या आयोजना मागील शासनाचा नेमका कोणता उद्देश आहे याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.

यावेळी व्यासपीठावर उपस्थित भारत विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक संजय देवल यांनी सुद्धा खेळाडूंना अमुल्य असे मार्गदर्शन केले. यावेळी जिल्ह्यातील विविध एकविध खेळ संघटनेचे पदाधिकारी, विविध शैक्षणिक संस्थेतील शारीरिक शिक्षण शिक्षक, क्रीडा मार्गदर्शक, पालक, भारत विद्यालयातील विविध शिक्षक आणि बहुसंख्य राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय खेळाडू उपस्थित होते.

यावेळी पाच आर्चरी, कूडो, या क्रीडा प्रकारामध्ये आंतरराष्ट्रीय प्रकारच्या क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या खेळाडूंचा मान्यवरांच्या शुभहस्ते गौरव करण्यात आला. तसेच योगा, आर्चरी, बॅडमिंटन, फुटबॉल, रोलबॉल, कुराश, बॉक्सींग ,पिंचॅक सिलेट, तेंग सु डो, रायफल शुटींग, ड्रॅाप रोबॅाल, इत्यादी खेळांमध्ये राज्याचे प्रतिनिधीत्व केलेल्या जवळपास ४६ राष्ट्रीय खेळाडूंचा मान्यवरांच्या शुभहस्ते मोमेंटो गुलाब पुष्प देऊन गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित क्रीडा मार्गदर्शक यांचा सुद्धा मान्यवरांच्या शुभहस्ते मोमेन्टो आणि गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज श्रीवास यांनी तर आभार प्रदर्शन रविंद्र धारपवार क्रीडा अधिकारी यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी करिता, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथील संदीप केळे, डॉ. जिवन मोहोड यांनी तसेच जिल्हा क्रीडा संकुलातील मानद कर्मचारी विनोद गायकवाड, भीमराव पवार, कृष्णा नरोटे, सुहास राऊत, इत्यादींनी अथक परिश्रम घेतले.

त्याचप्रमाणे बुलढाणा येथील सहकार विद्या मंदिर येथे सुद्धा आज दि.१५ जानेवारी २०२५ रोजी ऑलम्पिक वीर कुस्तीगीर स्व.खाशाबा जाधव यांचे जयंती दिनाचे औचित्य साधून, राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात आला. सहकार महर्षी भास्करराव शिंगणे विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, चौथा तालुका जिल्हा बुलढाणा येथे सुद्धा रॅली तसेच तालुका क्रीडा संकुल, मलकापूर येथे खेळाडूंचा सत्कार व क्रीडाविषयक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. शिवाजी विद्यालय बुलढाणा येथे सुद्धा आज दि. १५ जानेवारी २०२५ रोजी राज्य क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी बि. एस. महानकर यांनी कळविले आहे.

# थार खुदनापूर येथील मंदिर चोरी प्रकरणी ०२ आरोपींना अटक




दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** पोलीस स्टेशन जानेफळ हद्दीतील ग्राम खुदनापूर येथे दिनांक १५/०१/२०२५ रोजी दुपारी गावातील महादेवाच्या मंदिरातून मंदिरातील काही वस्तू चोरी झाल्याची घटना घडली असून सदर प्रकरणी जानेफळ पोलिसांनी गावकऱ्यांच्या मदतीने आरोपी नामे उमेश रमेश मोरे वय २४ वर्ष, महेश रमेश मोरे वय २२ वर्ष तसेच अल्पवयीन बालक नामे चेतन गणेश सोनवणे सर्व राहणार मिलिंद नगर मेहकर यांना ताब्यात घेतले असून आरोपींकडून मंदिरातील पितळी त्रिशूल व डमरू तसेच काशा धातूचा घंटा असा एकूण ५७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. जानेफळ पोलिसांनी यातील ०२ आरोपी यांना नमूद गुन्ह्यात अटक केली असून अल्पवयीन बालकास बाल न्याय मंडळ येथे हजर करीत आहोत. सदरची चोरी करणारे चोर पकडण्यात खुदनापूर येथील गावकऱ्यांनी मोलाची मदत केली असून आरोपींना तात्काळ अटक करून आरोपींनी आणखी काही चोऱ्या केल्या आहे का याचा सखोल तपास करत आहोत.

तरी पोलीस स्टेशन जानेफळ हद्दीतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की शेती साहित्य चोरी, गुरेढोरे चोरी तसेच मंदिरातील चोरी रोखता यावी याकरिता गावात तसेच शिवारात भटकंती करत असलेल्या संशयित इसमा बाबत तात्काळ जानेफळ पोलीस स्टेशनला माहिती द्यावी. उपरोक्त कारवाई ही अनिल डोंगरदिवे पोलीस पाटील थार, श्री लाखडे माजी पोलीस पाटील खुदनापूर तसेच खुदनापूर येथील गावकरी मंडळी व पोलीस स्टेशन जानेफळ येथील ASI अरविंद चव्हाण, Hc पंढरी काकड, पो कौ देवेंद्र इंगळे विनोद फुफटे आदींनी केली.

# महाराष्ट्र शासनाचे १८ वर्षे मुदतीचे २,५०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या १८ वर्षे मुदतीच्या २,५०० कोटींच्या (' ७.१४ % महाराष्ट्र शासनाचे रोखे ,२०४३ ' ) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकासकामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल.

२१ जानेवारी, २०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २१ जानेवारी, २०२५ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई–कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई–कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई–कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २२ जानेवारी, २०२५ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

कर्जरोख्याचा कालावधी १८ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी ८ जानेवारी, २०२५ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक ८ जानेवारी, २०४३ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा ७.१४ टक्के दरसाल दर शेकडा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी दिनांक जुलै ८ आणि जानेवारी ८ रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (ड्ढठ) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री–खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

# उमाळा येथे शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची २५ वी सभा व रब्बी पीक नियोजन शेतकरी मेळावा संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजी कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा अंतर्गत शेतकरी–शास्त्रज्ञ मंचची २५ वी सभा तालुक्यातील उमाळा येथे संपन्न झाली. तसेच रब्बी पीक नियोजन शेतकरी मेळावाही घेण्यात आला. या सभेस प्रमुख उपस्थिती सरपंच (उमाळा) पंडितराव सपकाळ,, बुलढाणा कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अमोल झापे, कृषी संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ज्ञ डॉ. दिनेश कानवडे, हवामान शास्त्रज्ज्ञ डॉ. जगदीश वाडकर, कृषी विज्ञान केंद्राचे पशुसंवर्धन विषयतज्ज्ञ मनेश यदुलवार, डॉ. नरेंद्र देशमुख, मंडळ कृषि अधिकारी पी.एम. देशमुख, कृषी सहाय्यक व्ही. के जाधव, कृषी पर्यवेक्षक आर. टी. म्हस्के, तसेच कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा, शेतकरी–शास्त्रज्ञ मंचचे सचिव विजयजी भुतेकर, कृषि संशोधन केंद्र, बुलढाणा–शेतकरी–शास्त्रज्ञमंचाचे सदस्य आणि उमाळा पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विषय तज्ञ कृषि विस्तार शिक्षण डॉ. जगदीश वाडकर यांनी केले. शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाची स्थापना, त्यामागची कुलगुरू डॉ. शरदजी गडाख, डॉ. पंदेकृवी, अकोला यांची संकल्पना व सद्यस्थितीत मंचाची ही २५ वी सभा असून याद्वारे प्रत्येक सदस्यांचे शेतीतील अनुभव व शास्त्राज्ञान्द्वारे मिळणारे तंत्रज्ञान याचे महत्व विषद करून मंचातील सदस्यांमार्फत जिल्ह्यातील शेतक–यांपर्यंत तंत्रज्ञानाचा प्रवास जलद व अविरत होत असल्याबाबत माहिती दिली. यावेळी डॉ. अमोल झापे यांनी हरभरा पिकातील बुरशीजन्य रोगाचे व्यवस्थापन व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासंदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.हरभरा पिकांमध्ये बुरशीजन्य रोगामुळे होणारे नुकसान व उत्पादनावर पडणारा फरक याबाबत सविस्तर माहिती देऊन शेतकऱ्यांनी या रोगांचे व्यवस्थापन करण्याबाबत सविस्तर माहिती दिली. शेतकऱ्यांसोबत विविध विषयावर हितगुज करून शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन उपाययोजना सांगितल्या.

डॉ. दिनेश कानवडे यांनी तृणधान्य व भरडधान्याचे आहारातील महत्त्व व लागवड पद्धती तंत्रज्ञान बाबत शेतकऱ्यांना माहिती दिली. तृणधान्य व भरडधान्याचे आहारात समावेश करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. यावेळी तृणधान्यांमध्ये असलेल्या अन्नघटकांची सविस्तर माहिती देऊन हे अन्नघटक शरीराला कसे पोषक ठरतात बाबत माहिती दिली. सध्या आपली आहार पद्धती व वाढत्या शारीरिक समस्याबाबत शेतकऱ्यांना अवगत करून तृणधान्य व भरडधान्याचे महत्त्व पटवून दिले. अवचितराव पालकर यांनी गावकऱ्यांना त्यांच्याकडे असलेल्या पशुधनासाठी मुरघासाचा वापर कशा पद्धतीने करता येऊ शकतो बाबत माहिती दिली. मुरघास कसा तयार करावा, त्याचा वापर केल्यानंतर जनावरांनी मध्ये काय फरक दिसतात व जनावरांसाठी तो कसा उपयुक्त आहे बाबत सविस्तर माहिती दिली. मुरघास तयार करण्यासाठी आवश्यक साधनसामग्री, पद्धती तसेच चारा पिकांची लागवड करून मुरघास तयार करावा जेणेकरून चाऱ्याच्या कमतरतेच्या दिवसांमध्ये व जनावरांना पोषक असा मुरघास तयार करून वापरावा, असे सांगितले.

यावेळी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्यावतीने पी. एम. देशमुखयांनी कृषि विभागामार्फत असलेल्या शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी कशा पद्धतीने घ्यावा त्यासाठी कोणकोणत्या कागदपत्राची पूर्तता करणे आवश्यक आहे व योजनांचा लाभ कशा पद्धतीने शेतकऱ्यांना दिला जातो बाबत सविस्तर माहिती दिली.




सर्व तज्ञांचे मार्गदर्शन झाल्यानंतर शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाचे सदस्य हरिभाऊ येवले, गणेश किसन तायडे, अवचितराव पालकर आणि आयोजक म्हणून प्रकाश सपकाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तद्नंतर दुर्गादास सपकाळ यांच्या म्हैस पालन दुग्ध्व्यवसायास सर्वांनी भेट देऊन व्यवस्थापनाबाबत चर्चा केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद सपकाळ तर प्रकाश सपकाळ यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाशराव सपकाळ आणि ग्रामस्थांनी, तसेच कृषी विज्ञान केंद्रयेथील शास्त्रज्ञांनी प्रयत्न घेतले. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.